# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकासह हद्दीलगतच्या ग्रामीण भागाचा एकत्रित विकास करण्यासाठी पीएमआरडीएमध्ये समावेश करण्याबाबत

**(१) ४५८ (२३-१२-२०१४). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर क्षेत्रिय विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) धर्तीवर सन १९९७ मध्ये शासनाने पुण्यासाठी पीएमआरडीए स्थापना करण्याची घोषणा करुन सन १९९९ मध्ये विधिमंडळात पीएमआरडीएच्या स्थापनेस मान्यता मिळाली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे, पिंपरी चिंचवड या महापालिकांसह पुणे खडकी, देहू रोड कॅन्टोंमेंट, तळेगाव दाभाडे, शिरुर, सासवड, आळंदी देवाची, या नगरपालिका आणि ३० कि.मी च्या हद्दीलगतच्या सुमारे ३९० गावांचा समावेश पीएमआरडीए मध्ये आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकासह हद्दीलगतच्या ग्रामीण भागाचा एकत्रित विकास करण्यासाठी पीएमआरडीएची स्थापना करण्याबाबत शासन स्तरावरून कुठली कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) नाही. असे आढळून येत नाही.

शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ४२ क मधील क्षेत्र विकास प्राधिकरण स्थापन करण्याच्या तरतूदीनुसार दि. ३१/०३/२०१५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे.

(२) शासनाने स्थापन केलेल्या पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या हद्दीमध्ये खालील क्षेत्रांचा समावेश आहे.

समाविष्ट महानगरपालिका / विशेष नियोजन प्राधिकरण (३) पुणे, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण

समाविष्ट नगरपालिका (०३) :- लोणावळा, तळेगांव व आळंदी

समाविष्ट तालुके (०८) :- मावळ, हवेली (भाग), पुणे शहर, खेड (भाग), शिरुर (भाग), भोर (भाग) व मुळशी (भाग).

समाविष्ट गावांची संख्या :- ४३८
एकूण क्षेत्र :- ३५३५ चौ.कि.मी.
(३) पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकांसह हद्दीलगतच्या ग्रामीण भागाचा एकत्रित व सुनियोजीत विकास होण्यासाठी शासनाने पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना केलेली आहे.

---

### मुंबईत कुरिअरच्या माध्यमातून बनावट बँक खाती उघडून करोडोचे चेक वटविल्याबाबत

**(२) ९१४ (२२-१२-२०१४). श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कुरिअरच्या माध्यमातून बनावट बँक खाती उघडून करोडोचे चेक वटविणा-या टोळीस माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कुरिअरच्या व्यवस्थापकावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणती कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) बृहन्मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाचे अधिपत्याखालील कोणत्याही पोलीस ठाणेत कुरिअरच्या माध्यमातून बनावट खाती उघडून डघडून करोडोचे चेक वटविणाऱ्या टोळीस माहे ऑगस्ट, २०१४ मध्ये वा त्या दरम्यान अटक केली बाबतचा गुन्हा नोद असल्याचे आढळून येत नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पुणे शहरातील भोसरी, दिघी, मोशी, चऱ्होली या भागातील रेडझोन परिक्षेत्रामुळे नागरिकांना मुलभूत सुविधा मिळत नसल्याबाबत

**(३) ४८१७ (२३-१२-२०१४). श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील भोसरी, दिघी, मोशी, चऱ्होली या भागातील रेडझोन परिक्षेत्रामुळे नागरिकांना मुलभूत सुविधा मिळत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्षेत्र रेडझोन मुक्त करुन तेथील नागरिकांना सोयीसुविधा पुरविणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) भोसरी, दिघी, मोशी व चऱ्होली मधील रेड झोन भागात रस्ते, वीज, पाणीपुरवठा, मलनि:सारण इत्यादी सुविधा पुर्वीपासून दिलेल्या असून त्या कायम आहेत. त्यामध्ये नव्याने वाढ करण्यात येत नाही.

(२) सदर बाब ही केंद्र शासन यांच्या स्तरावरील धोरणात्मक बाब आहे. सदर बाब केंद्र शासन यांच्या निर्णयावर अवलंबून आहे. राज्य शासन/महानगरपालिकेकडून याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) वरील प्रमाणे.

---

## मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स (बीकेसी) येथील अमेरीकन शाळा बॉम्बने उडविण्याचा केलेला कट

**(४) ८८६८ (०७-०४-२०१५). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स (बीकेसी) येथील अमेरीकन शाळा बॉम्बने उडविण्याचा कट केल्याचे दि.१७ जानेवारी, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळा उडविण्याच्या कटासंदर्भात पोलीसांनी संगणक, हार्डडिस्क, मोबाईल अशा वस्तू जप्त केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याची पूर्ण चौकशी झाली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व उपरोक्त शाळेसह इतर शाळांच्या सुरक्षिततेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) दिनांक १८/१०/२०१४ रोजी, अनीस शकील अहमद अन्सारी, रा.कुर्ला, मुंबई याने मुंबईतील परदेशी नागरीक व अमेरिकन शाळा यांचेवर हल्ला करण्याचा कट रचला होता. सदर बाबत दहशतवाद विरोधी पथक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी गुन्हा नोंद क्र.१३/२०१४, कलम ४३, ६६ सह कलम ६६ (ए) (ए) माहिती व तंत्रज्ञान कायदा सह कलम १२० (ब), ११५ सह कलम ३०२ भा.दं.वि. अन्वये गुन्हा दाखल करुन नमुद इसमास अटक करण्यात आली.

(२) सदर गुन्ह्यात खालील प्रमाणे मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.

१. दोन मोबईन फोन

२. तीन सी.पी.यू.

३.हार्डडिस्क व मेमरी कार्ड

(३) अटक आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्याइतपत पुरावा प्राप्त झाल्याने दिनांक १४/०१/२०१५ रोजी त्यांचे विरुध्द मा.न्यायलयात दोषारोपपत्र दाखल केले असून गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिका हद्दीतील बी.डी.पी. बाबत**

**(५) १२१९७ (०७-०४-२०१५). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने नव्याने समाविष्ट झालेल्या गावांसाठी जो विकास आराखडा २००५ साली मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला होता त्यास टप्प्याटप्प्याने २००८ सालापासून मंजुरी मिळत आहे. त्यामध्ये बी.डी.पी.चा प्रश्न प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बी.डी.पी. चा प्रश्न प्रलंबित असण्याची कारणे काय, त्यावर केव्हापर्यंत निर्णय अपेक्षित आहे,

(३) पुणे म.न.पा. ने २०१३ साली जो विकास आराखडा जुन्या हद्दीसाठी प्रस्थापित केला आहे त्या आराखडयात बी.डी.पी. दर्शविला आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) व (२) पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यामधील डोंगर माथा/ डोंगर उताराच्या जमिनी बीडीपी या आरक्षणाखाली दर्शविण्यात येऊन त्याबाबतची नियमावली शासनाने जनतेच्या हरकती व सूचनांसाठी प्रसिध्द केली होती. प्राप्त हरकती / सूचना तसेच नियुक्त अधिकारी व संचालक, नगर रचना यांचा अभिप्राय विचारात घेऊन शासनाने विकास आराखड्यामध्ये बीडीपी आरक्षणाबाबतचा फेरबदल शासन अधिसूचना क्र.टिपीएस-१८१४/६९७/प्र.क्र.१३४/१४/BDP/ ईपी मंजूरी/ नवि-१३, दि.०५/०८/२०१५ अन्वये मंजूर केला आहे.

(३) जुन्या हद्दीच्या विकास आराखड्याची फेरतपासणी पुणे महानगरपालिकेतर्फे सुरु करण्यात आली असून अद्याप जुन्या विकास आराखड्याची विकास योजना शासनास सादर करण्यात आलेली नाही. त्यामुळे जुन्या आराखड्यामध्ये बीडीपीचे आरक्षण दर्शविण्यात आले किंवा कसे याबाबत स्पष्टता करता येत नाही.

---

**पर्वती, पुणे येथील टी.पी.स्किम नं. ३ फायनल प्लॉट नं.५७१ अ आणि ५७२ ब येथील ७० हजार चौरस फूट प्राथमिक शाळेसाठी भूसंपादन करण्याची कार्यवाहीबाबत**

**(६) १४५२० (०७-०४-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पर्वती, पुणे येथील टी.पी.स्किम नं. ३ फायनल प्लॉट नं.५७१ अ आणि ५७२ ब येथील ७० हजार चौरस फूट प्राथमिक शाळेसाठी भूसंपादन करण्याची कार्यवाही सुरु असताना, त्यापैकी ३५ हजार चौरस फूट जागा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेसाठी देण्यात येत असल्याची बाब जानेवारी, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) या आरक्षणातील फा.प्लॉ.क्र. ५७१ ब या खाजगी मालकीच्या मिळकतीवर महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ अन्वये घोषित केलेले झोपडपट्टी असलेने या १५४८.६६ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी झोपडपट्टी निर्मुलन आदेश दि. ०३/०५/२०१४ रोजी पारित करण्यात आला आहे. तसेच झोपडपट्टी पुनर्वसना खालील १५४८.६६ चौ.मी. क्षेत्र वगळून उर्वरित १९५१.३४ चौ.मी. क्षेत्राबाबत भूसंपादनाची कार्यवाही करणेस मा.महापालिका आयुक्त, पुणे महानगपालिका यांनी मंजूरी दिली आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जयप्रभा स्टुडीओ सहित कोल्हापूरातील महत्वाच्या वास्तू इमारती हेरिटेज यादीत समाविष्ट करण्याबाबत

**(७) १४७४७ (०८-०४-२०१५). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयप्रभा स्टुडीओ सहित कोल्हापूरातील महत्वाच्या वास्तू इमारतीची हेरिटेज यादीत कुठल्या कायद्यांतर्गत समाविष्ट केल्याचे मा.उच्च न्यायालयाने शासनाला खुलासा मागविल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील हेरिटेज यादी तयार करणे हे वास्तविक महानगरपालिकेचे काम आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय, जयप्रभा स्टुडीओ हेरिटेज मिळकतीचे यादीमध्ये समाविष्ट केल्याने त्या विरुध्द श्रीमती लता मंगेशकर यांनी शासनाचे विरुध्द याचिका क्र. ७११८/२०१३ दाखल केली आहे. अद्‌याप या याचिकेवर निर्णय झालेला नाही.

(२) व (३) होय.

कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रासाठी हेरीटेज नियमावली शासनाने दि २९/०२/२०१२ रोजीच्या शासन अधिसूचनेद्वारे मंजूर केली आहे, या नियमावलीनुसार हेरीटेज स्थळांची यादी महानगरपालिकेच्या आयुक्तांनी हेरीटेज समितीच्या मान्यतेने करावयाची आहे.

शासनाने कोल्हापूर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमधील हेरिटेज यादीमध्ये समाविष्ट वास्तुंचा विकास अनुज्ञेय करताना महानगरपालिका आयुक्तांना सल्ला देण्यासाठी हेरिटेज कॉन्झर्वेशन कमिटीची स्थापना (शासन अधिसूचना क्र.टीपीएस-२११३/७०३/प्र.क्र.५८४/१३/नवी-१३) दि. १७/०४/२०१५ रोजी केली आहे.

(४) लागू नाही.

---

**ठाणे शहरातील अग्निशमन विभागात अत्याधुनिक साधनसामुग्रीचा अभाव असल्याबाबत**

**(८) १७३३८ (११-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे शहरात टोलेजंग इमारती उभ्या राहत असतांना अग्निशमन मात्र अत्याधुनिक साधनसामुग्रीचा अभाव असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फायरसुटस, हेल्मेट, सेफ्टी, शुज लॅडर्स, हॉयड्रॉलिक प्लॅटफार्म, वॉटरटँकर्स इत्यादींची कमतरता आहे तसेच नऊ अग्निशमन केंद्र उभारण्याचा प्रस्तावही शासनाकडे प्रलंबित आहे असून त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून कर्मचाऱ्यांना हेल्मेट, सेफ्टीशूज यासारखी पर्सनल प्रोटेक्टीव्ह इक्वीपमेंटस दरवर्षी दिली जातात. फायरसुटस देण्याबाबत कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे. अग्निशमन विभागाकडे लॅडर्स, हायड्रॉलिक प्लॅटफार्म, वॉटर टँकर्स इत्यादीची कमतरता नाही. नऊ अग्निशमन केंद्र उभारण्याचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील चेंबूरच्या चुनाभट्टी परिसरात कॅडमॅक्स नावाच्या इन्स्टिट्युटच्या नावाखाली मॅकेनिकलचे शिक्षण देण्याचे आमिष दाखवून विद्यार्थ्यांना फसविल्याबाबत**

**(९) १७३४२ (१२-०८-२०१५). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील चेंबूरच्या चुनाभट्टी परिसरात कॅडमॅक्स नावाच्या इन्स्टिट्युटच्या नावाखाली मॅकेनिकलचे शिक्षण देण्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीने कोर्ससाठी प्रवेश फी रु.३० हजार घेऊन विद्यार्थ्यांना फसविले असल्याचे दिनांक २० एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी विद्यार्थ्यांनी स्थानिक पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय.

(३) या प्रकरणी चौकशी केली असता आरोपीने सी.एन.सी.मिलींग, ऑपरेटींग ॲन्ड प्रोग्रॅमिंग सिस्टीम या कोर्सचे प्रशिक्षण देणेकामी CADOMAX नावचे इन्स्टीट्यूट स्थापन करुन सदर इन्स्टीट्यूट प्रमाणित नसतांना ते प्रमाणित व सरकारमान्य असल्याचे सांगून तसेच सदर इन्स्टीट्यूटच्या माध्यमातून सी.एन.सी. मिलिंगचे पायाभूत प्रशिक्षण देण्याचे व प्रशिक्षण घेतलेबाबत मार्स टेक्नीकल इन्स्टीट्यूट व एम.एस.एम.ई. या सरकारमान्य संस्थांचे प्रमाणपत्र देण्याचे अमिष दाखवून फिर्यादी व साक्षीदार यांच्याकडून रु. ८८०००/- घेवून फिर्यादी व साक्षीदार यांना कुठलेली प्रशिक्षण व प्रमाणपत्र न देता त्यांची फसवणूक केली. सदर प्रकरणी चुनाभट्टी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १७३/१५ भादविसं कलम ४२० अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे येथील संगमवाडी, येरवडा, औंध यासारख्या ठिकाणी नदीपात्रात राडारोडा टाकल्या जात असल्याबाबत**

**(१०) १७६१३ (१०-०८-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील संगमवाडी, येरवडा, औंध यासारख्या ठिकाणी नदीपात्रात दररोज हजारो ट्रक राडारोडा टाकला जात असल्याची बाब दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकेकाळी नितळ पाण्याने वाहनाऱ्या मुळा-मुठा नद्यांमध्ये राडारोड व कचरा टाकल्यास एका ट्रकमागे ५ हजार रुपये दंडाची तरतूद असतानाही संबंधित अधिकारी कचरा टाकणाऱ्यावर कोणतीच दंडात्मक कारवाई करत नसल्याने कचरा घाणीच साम्राज्य वाढत आहे, याबाबत महापालिका कोणतीही भूमिका घेत नसल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती नद्यांचे पाणी स्वच्छ ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२७-०१-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नदीपात्रालगत राडारोडा टाकल्यानंतर पुणे महानगरपालिकेतर्फे वेळोवेळी दंडात्मक तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ प्रमाणे कारवाई केली जाते.

(३) राडारोडा नदीपात्रालगत खाजगी मिळकतीमध्ये पडल्यामुळे पाणी दुषित होते ही वस्तुस्थिती नाही, तथापि, नदीपात्रालगत राडारोडा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई तसेच महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ५३ अन्वये नोटीस देण्यात आली आहे. तसेच चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे येथे एफ.आय.आर दाखल केला आहे.

पुणे महानगपालिकेतर्फे राडारोडा टाकणाऱ्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी स्वतंत्र उपद्रव शोधक पथकाची एन.डी.स्कॉडाची नेमणुक करण्यात आलेली आहे.

पुणे महानगरपालिका क्षेत्रात निर्माण होणारा राडारोडा टाकण्यासाठी वाघोली गट नं. १२९/२ (८००० चौ.मी.) दगडखाणीची जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी सट्टा चालविणाऱ्या सहा बुकींना गुन्हे शाखेने छापा टाकून अटक केल्याबाबत

**(११) १८०३३ (१०-०८-२०१५). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी आयपीएल टी-२० स्पर्धेतील क्रिकेट सामन्यावर सट्टा चालविणाऱ्या सहा बुकींवर गुन्हे शाखेने छापा टाकून दि.१४ मे, २०१५ रोजी अटक केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अटक केलेल्या बुकींवर कोणती कारवाई करण्यात आलेली आहे तसेच सट्टा रोखण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात आलेली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय.

दिनांक १९.०५.२०१५ रोजी गोल्डन पॅलेस, एल.बी.एस. रोड, घाटकोपर, मुंबई या ठिकाणी आयपीएल टी-२० स्पर्धेतील चेन्नई विरुध्द मुंबई इंडियन्स यांचेतील क्रिकेट सामन्यावर सट्टा चालविणाऱ्या ३ बुकींना समाजसेवा शाखेने धाड टाकून कारवाई केली.

(२) ३ बुकींवर घाटकोपर पोलीस ठाणे येथे गुरक्र १९६/२०१५, कलम ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४२०, ३४ भादंविसह कलम ४ (अ), ५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायदासह कलम २५ (क) इंडियन टेलिग्राफ ॲक्ट अन्वये कारवाई करण्यात आली. सदरचा गुन्हा तपासाधीन आहे.

क्रिकेट सामन्यांवर सट्टा रोखण्यासाठी क्रिकेट बेटींग चालविणाऱ्या बुकींबाबत गुप्तबातमीदारांकडून माहिती प्राप्त करुन कारवाई करण्यात येते.

तसेच यापुर्वी क्रिकेट बेटींगच्या गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या बुकींच्या हालचालींची गोपनियरित्या माहिती घेण्यात येत असते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोंढवा खुर्द आणि बुद्रुकसाठी (जि.पुणे) बांधण्यात आलेली अग्निशमन केंद्र इमारत धुळ खात पडल्याबाबत

**(१२) २३६६१ (११-०८-२०१५). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा खुर्द आणि बुद्रुकसाठी (जि.पुणे) बांधण्यात आलेली अग्निशमन केंद्र इमारत गेल्या आठ वर्षापासून धुळ खात पडल्याची बाब माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या परिसरातील आगीच्या घटना पाहता सदरचे केंद्र सुरु करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
(२) सदर अग्निशमन केंद्राचा वापर सुरु असल्याबाबत आयुक्त, पुणे महानगरपालिका यांनी अहवाल सादर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्याबाबत**

**(१३) २५४९४ (१०-०८-२०१५). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविल्यानंतर महानगरपालिकेकडून विकासकास विकास हस्तांतर हक्क (टीडीआर) देताना संबंधित विकासकाने प्रकल्पातील सोयी-सुविधांची पूर्तता केली आहे की नाही याची खातरजमा केली जात नसल्याची बाब मे, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) नाही.

अंतिम भोगवट प्रमाणपत्र देण्यापूर्वी बांधकाम सुरु करण्याच्या दाखल्यातील सर्व अटी व शर्तींची पुर्तता होत असल्याबाबत तसेच आवश्यक त्या सर्व सोईसुविधा गॅस पाणीपुरवठा, ड्रेनेज याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र पुणे महानगरपालिका यांचेकडून घेण्यात येते. महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ यांचेकडून विद्युत व्यवस्था व लिफ्ट बाबत PWD खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र व फायर फार्यटिंग बाबत पुणे महानगरपालिका फायर सेफ्टी विभागामार्फत ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात येते व सर्व कागदपत्रांची पुर्तता केलेनंतरच अंतिम भोगवटा झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दिला जातो.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील महानगरपालिका व नगरपरिषदांमध्ये ठेकेदारांमार्फत नेमलेले असंख्य कुशल कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन मिळणेबाबत**

**(१४) २८२१४ (०५-११-२०१५). श्री.बळीराम सिरसकर (बाळापूर), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदांमध्ये ठेकेदारांमार्फत असंख्य कुशल कंत्राटी सफाई कामगार आपल्या कौशल्याने दिवस-रात्र, ऊन-पावसात शहरातील कचरा उचलण्याचे आणि गटारे-नाले साफ करणे भूमिगत शौचालय नलिका साफ ठेवणे, मेलेली-कुजलेली जनावरे उचलणे, हे काम करत असताना जीव धोक्यात घालून आपले शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवत असताना महानगरपालिकेने नेमलेल्या ठेकेदारांमार्फत असंख्य कुशल कंत्राटी सफाई कामगारांना किमान वेतन केवळ ४५०० रुपये दिले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महापालिकेच्या कर्मचाऱ्यांचे किमान वेतन दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ च्या अधिसुचनेनुसार कुशल कामगारास रुपये १४,००० असताना शासनाच्या नगर विकास विभागाने सफाई कामगारांच्या वेतनाची दखल घेण्याबाबत हजारो कंत्राटी सफाई कामगाराचे 'श्रमजीवी कामगार संघटना-महाराष्ट्र' संघटनेच्या नेतृत्वाखाली दिनांक २२ जुलै, २०१५ रोजी माननीय मुख्यमंत्री यांच्या वर्षा निवासस्थानी स्वच्छता करण्याचे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २४ फेब्रुवारी, २०१५ च्या अधिसुचनेनुसार निर्धारित वेतन व महागाई भत्ता, राज्य विमा योजना करुन सर्व कंत्राटी कामगारांना किमान ५ लाखाचा कौटुंबिक आरोग्य विमा देण्यात यावा, सफाई कामगाराना कुशल कामगार म्हणून गणना करावी कंत्राटी सफाई कामगारांस महानगरपालिका, नगरपरिषद कर्मचाऱ्याप्रमाणे वेतन व सेवा-सुविधांचा लाभ मिळण्यासाठी हजारो सफाई कामगारांनी शासनाकडे मागणी केली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले तसेच सफाई कर्मचाऱ्यांना किमान वेतन सेवा-सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

तथापि, दिनांक २२.०७.२०१५ रोजी श्रमजीवी संघटनेच्या वतीने त्यांच्या मागण्यांकरिता माजी लोकप्रतिनिधीच्या नेतृत्वाखाली चर्चगेट ते आझाद मैदान असे मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते, असा वरिष्ठ पोलीस निरिक्षक, मलबार हिल पोलीस ठाणे, मुंबई यांनी अहवाल सादर केला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) दिनांक २४.०२.२०१५ च्या अधिसूचनेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

___

**पुणे जिल्ह्यातील (ता.हवेली) मुंढव्यातुन केशवनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर महात्मा फुले चौकात भुयारी मार्ग होण्याबाबत**

**(१५) २९०२५ (२३-१२-२०१५). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील (ता.हवेली) मुंढव्यातुन केशवनगरकड़े जाणाऱ्या रस्त्यावर महात्मा फुले चौकात रस्ता ओलांडताना वर्षभरात तीन जणांचा अपघाती मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ठिकाणी भुयारी मार्ग करावा अशी स्थानिक नागरीकांनी मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मागणीवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलबांची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) महात्मा फुले चौक मुंढवा येथून केशवनगरकडे रस्ता ओलांडत असताना दिनांक ४ मार्च, २०१५ रोजी एक प्राणांतिक अपघात घडलेला आहे. याबाबत मुंढवा पोलिस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर नं.२२/१५ दिनांक ४.३.२०१५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

(२) सदर ठिकाणी ग्रेड सेपरेटर (भुयारी मार्ग) करण्याकरिता माजी महापौर यांनी दिनांक १५.११.२०१४ च्या पत्रान्वये मागणी केली होती.

(३) व (४) उक्त प्रकरणी पुणे महानगरपालिकेने सदरहू भुयारी मार्ग बांधण्याबाबत निर्णय घेतलेला नाही. सदर भुयारी मार्ग बांधण्याकरिता भुयारी मार्ग बांधण्याच्या प्रस्तावित ठिकाणी सर्व्हेक्षण करुन सदर भुयारी मार्गाची शक्यता/अशक्यता पडताळणी करणे आवश्यक आहे. सदर कामी तज्ञ सल्लागार यांची नेमणूक करुन त्याबाबतचा अहवाल तयार करणे आवश्यक आहे. तसेच वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार या प्रकल्पासाठी पुणे महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकामध्ये आर्थिक तरतूद उपलब्ध करुन सदर भुयारी मार्गाचे काम करणे शक्य होणार आहे.

---

**पुणे महानगरपालिकेच्या भामा-आसखेड पाणी पुरवठा योजनेबाबत**

**(१६) २९१४४ (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भामा-आसखेड पाणी पुरवठा योजनेसाठी पुणे महानगरपालिका महासभेने दिनांक २०.०२.२०१३ रोजी वा त्या सुमारास मान्यता दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत योजनेचे काम बंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भामा-आसखेड पाणी पुरवठा योजना सुरु करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) होय.

(२) सद्य:स्थितीत पुणे महानगरपालिकेच्या भामा आसखेड पाणीपुरवठा योजनेतील पुणे महानगरपालिका हद्दी बाहेरील जॅकवेल - पंपहाऊस उभारणे, जॅकवेलपासून जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत पाईप लाईन टाकणे व जलशुध्दीकरण केंद्रापासून पुणे महानगरपालिका हद्दीपर्यंत शुध्द पाण्याची पाईप लाईन टाकणे हि कामे बंद आहेत. मात्र, पुणे महानगरपालीका हद्दीतील फिडर मेन लाईन टाकणे व उंच पाण्याची टाकी बांधणे (ई.एस.आर) बांधणे ही कामे सुरु आहेत.

(३) धरणग्रस्त शेतकरी यांच्या मागण्यांबाबत तोडगा काढण्यासाठी सर्व संबंधितांची बैठक आयोजित करण्याबाबत विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांना दिनांक २३.१२.२०१५ च्या पत्रान्वये कळविले असून, त्याबाबत पुणे महानगरपालिकेमार्फत पाठपुरावा सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### खामगाव (जि.बुलढाणा) यथील नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(१७) २९१६९ (२१-०१-२०१६). ॲड.आकाश फुंडकर (खामगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खामगाव (जि.बुलढाणा) येथील नगरपरिषदे अंतर्गत असलेल्या पाणी पुरवठा योजनेच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोद्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करणेबाबत आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानूसार सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत नगरपरिषद प्रशासन संचालनालयास सूचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार निवेदनातील प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडून चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. त्या नुसार सदर प्रकल्पाची निविदा प्रक्रिया व त्या संदर्भात यापूर्वी उपस्थित लेखापरिक्षण आक्षेप याच्या अनुषंगाने विशेष लेखापरिक्षण करणेबाबत संचालक, स्थानिक निधी लेखा यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

---

## पुणे शहरात चपला दुरुस्ती ते बूट पॉलिशपर्यंतच्या कामाच्या जबाबदारी वर उत्तर भारतीयांनी अतिक्रमण केल्याबाबत

**(१८) २९५१३ (२३-१२-२०१५). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात चपला दुरुस्ती ते बूट पॉलिशपर्यंतच्या कामाच्या जबाबदारीवर उत्तर भारतीयांनी अतिक्रमण केल्याने स्थानिक गटई कामगारांचा व्यवसाय धोक्यात आल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील गटई कामगारांच्या व्यवसायाला उभारी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :** (१) पुणे शहरात चपला दुरुस्ती ते बुढ पॉलिश पर्यंतच्या कामाच्या जबाबदारीवर उत्तर भारतीयांनी अतिक्रमण केल्याबाबतची कोणतीही बाब पुणे महानगरपालिका प्रशासनाच्या निदर्शनास आलेली नाही.

(२) पुणे महानगरपालिका हद्दीत गटई कामगारांना बैठे परवाने देण्यात आले असून, वर्षानुवर्षे पारंपारिक पध्दतीने गटई कामगार काम करीत असलेल्या ठिकाणाचे सर्वेक्षण करुन मुख्य सभा ठराव क्र.१२, दिनांक २२.५.२००२ ने पुनश्च एकूण ३२० गटई कामगारांना बैठे परवाने देण्यात आलेले आहेत.

तसेच राष्ट्रीय फेरीवाला धोरणानुसार गटई कामगारांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्यात आलेले असून त्यांना आकारण्याच्या फी बाबत शहर फेरीवाला समितीमध्ये कमीत कमी फी आकारण्याबाबत प्रशासनाने तरतूद केलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेतल्या शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे वस्तु पुरविल्याबाबत

**(१९) २९६५० (२१-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना निकृष्ट प्रतीच्या वस्तू देवून पिंपरी-चिंचवड महापालिकेमार्फत गैरव्यवहार केल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) सन २०१५-१६ या वर्षात पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या मोफत साहित्यापैकी फक्त शालेय गणवेश, पी.टी.गणवेश तसेच खेळ-गणवेश व स्वेटर्सचे वाटप केलेले आहे. या साहित्य वितरणाबाबत महापालिकेत कोणत्याही प्रकारची तक्रार प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील ऐरोली येथे नवीन पोलीस स्टेशन स्थापन करण्याबाबत**

**(२०) ३०३२९ (२१-०१-२०१६). श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील ऐरोली विभागात खून, चोऱ्या, किडनॅपिंग या सारख्या घटना सर्रास घडत असल्याने तेथे स्वतंत्र पोलीस स्टेशन स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने पोलिस महासंचालक यांचेकडे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर निर्णय घेण्यात आला आहे काय, असल्यास निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) अद्याप निर्णय झाला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे. पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांनी दिनांक २५.०५.२०१५ च्या पत्रान्वये रबाळे व कोपरखैरणे पोलीस ठाण्याचे विभाजन करुन ऐरोली येथे पोलीस ठाणे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालकांस सादर केला आहे.
(२) राज्य पालीस दलामध्ये पाच टप्प्यामध्ये एकूण ६१४९४ पदे व १२२ पोलीस ठाणीं निर्माण करण्याचा तत्वत: निर्णय घेण्यात आला आहे. त्यातंर्गत पदनिर्मितीच्या पहिल्या टप्प्यामध्ये गृह विभाग, शासन निर्णय दिनांक ४ मार्च, २०१४ अन्वये राज्य पोलीस दलामध्ये विविध संवर्गातील १२०४३ पदे व ६३ पोलीस ठाणीं निर्माण निर्माण करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. पदनिर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दि.२९.९.२०१५ चे पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असून त्यामध्ये राज्य पोलीस दलामध्ये १२५४९ पदे व २९ पोलीस ठाणीं नव्याने निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला आहे. पदनिर्मितीच्या तिसऱ्या किंवा चौथ्या

टप्प्यामध्ये रबाळे व कोपरखैराणे पोलीस ठाण्याचे विभाजन करुन नवीन ऐरोली पोलीस ठाणे निर्माण करणे व त्याकरिता विविध शाखा व विविध संवर्गातील एकूण १८२ पदे निर्माण करण्याचे विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डोंबिवली कल्याणच्या वाहतुक नियंत्रण पोलिसांच्या मनमानी कारभाराबाबत**

**(२१) ३११८६ (२१-०१-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली कल्याणच्या वाहतुक नियंत्रण पोलिसांच्या मनमानी कारभाराचा नमूना एका सामाजिक कार्यकर्त्याने उघडकीस आणला असून वाहतूक पोलिसांच्या दंडाची पावती खासगी ठेकेदार देत असल्याचे आढळून आले असल्याचे माहे २६ ऑगस्ट, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत दोषी आढळून येणाऱ्या संबंधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०४-२०१६) :** (१) वाहतूक पोलीसांकडून देण्यात येणारी दंडाची पावती खाजगी ठेकेदार देत असल्याबाबत श्री.सत्यजित बर्मन यांची तक्रार प्राप्त झाली होती.

(२) श्री.सत्यजित बर्मन यांनी दिलेल्या तक्रारीवरुन सहाय्यक पोलीस आयुक्त, कल्याण वाहतुक विभाग यांनी चौकशी केली आहे. चौकशीमध्ये असे आढळून आले की, कर्षित करुन आणलेल्या वाहनांचे कर्षित शुल्क वसुल करण्याच्या पावत्या क्रेनमधील कर्मचारी तयार करुन तर शासकीय दंडाच्या पावत्या पोलीस अंमलदार कसुरदार वाहनचालकांना अदा करतात. कल्याण वाहतुक उपविभागाच्या सहाय्यक उपनिरीक्षक यांनी दि. २४.८.२०१५ रोजी कर्षित करुन आणलेली वाहने वाहतूक विभागामध्ये उतरवुन ठेवण्यास सांगून सहाय्यक उपनिरिक्षक नैसर्गिक विधीकरीता गेले होते. जाण्यापूर्वी कर्षित वाहनाची पावती देणाऱ्या कर्मचाऱ्यांकडे वाहन घेण्यास कोणी आल्यास त्याची गैरसोय होऊ नये म्हणून सर्वसाधारण पावती (जीईएन रिसिट) पुस्तकामधील काही पावत्यांवर स्वाक्षरी करुन ठेवल्या. श्री.बर्मन थांबण्यास तयार नसल्याने त्यांना शासकीय दंडाची पावती व कर्षित वाहनाची पावती अदा केलेली आहे.

भविष्यात जीईएन पावती कर्षित वाहनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून देण्यात येऊ नये. तसेच नागरीकांचा वेळ वाया जाऊ नये याकरिता जीईएन पावत्या देण्याकरीता ठाणे अंमलदार किंवा स्वतंत्र पोलीस कर्मचारी नेमण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यामध्ये विविध ठिकाणी गत दहा वर्षापासून पाकिस्तानी नागरिक राहत असल्याबाबत**

**(२२) ३२१७७ (२१-०१-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये विविध ठिकाणी गत दहा वर्षापासून आलेले २०२३ पाकिस्तानी नागरिक राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाकिस्तानी नागरीकांकडून देशघातक कृत्य केली जात असल्याने जनतेमध्ये भितीचे वातावरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने पाकिस्तानी नागरीकांचा शोध घेण्यासाठी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०४-२०१६) :** (१) राज्याच्या विविध ठिकाणी गत १० वर्षापासून ऑक्टोबर, २०१५ पर्यंत ३२५१ पाकिस्तानी नागरीक अधिकृतरित्या वास्तव्य करीत आहेत.

(२) गेल्या १० वर्षामध्ये सदर पाकिस्तनी नागरीकाकडून देशविघातक कृत्य केल्याबाबत कोणतीही गुन्हा दाखल नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर शहरातील भूमिगत मलनिस्सारण योजनेबाबत**

**(२३) ३२४७३ (२१-०१-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर शहरातील भूमिगत मलनिस्सारण योजना सन २००९ मध्ये सुरु झाली असून सदर योजना अद्यापही कार्यान्वीत झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या तीसऱ्या आठवड्यात आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजने अंतर्गत असलेले दोन ट्रिटमेंट प्लॅन्ट पैकी एक इरई नदीच्या पात्रात तर दुसरे पठाणपुरा येथून वाहणाऱ्या झरपटनदी जवळ उभारण्यात आल्यामुळे सदर योजना तांत्रिकदृष्ट्या तपासणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर योजना तांत्रिकदृष्ट्या तपासण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे तसेच सदर योजना कार्यान्वीत होण्यास किती कालावधी लागणार आहे?

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत युआयडीएसएसएमटी अभियानांतर्गत मंजूर चंद्रपूर शहर मलनिस्सारण प्रकल्प केंद्र शासनामार्फत सन २००७ मध्ये मंजूर करण्यात आला आहे. सदर प्रकल्प कार्यान्वित झाला नाही.

(२), (३) व (४) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, पुणे यांनीतांत्रिक तपासणी केल्यानुसार व राज्यस्तरीय समितीने मान्यता दिलेल्या प्रस्तावात असलेल्या दोनही स्थळाचे ठिकानीची सिव्हरेज ट्रिटमेंट प्लॉटचे बांधकाम करण्यात आलेले असल्यानेतसेच जरी ट्रिटमेंट प्लॉट नदी पात्राजवळ उभारण्यात आले असले तरी उच्चतम पूर रेषा विचारात घेवून मशीनरी इत्यादिची उभारणी करण्यात आलेली असल्याबाबत अहवाल आयुक्त चंद्रपूर महानगरपालिका यांनी शासनास सादर केला आहे. सदर प्रकल्प तात्काळ पूर्ण करणेबाबत सूचना चंद्रपूर महानगरपालिकेस देण्यात आल्या आहेत.

---

**मुंबईतील मंत्रालयातून गत वर्षभरात संगणक व इतर वस्तू चोरीला गेल्याबाबत**

**(२४) ३२८३३ (२१-०१-२०१६). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मंत्रालयातून गत वर्षभरात संगणक, संगणकाच्या हार्डडिस्क, रॅम, सीपीयु, प्रिंटर्स, फॅक्स मशिन, स्कॅनर इ. वस्तू चोरीला गेल्या आहेत असे दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालयातील काही विभागात काम करणारे कर्मचारी हे रात्री मंत्रालयात मुक्काम करतात असे ही निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मंत्रालयात होणाऱ्या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) व (२) होय

(३) मंत्रालय परिसरात होणाऱ्या चोऱ्यांना आळा घालण्यासाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविण्यात आले असून परिसरात दिवस-रात्रौ आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगाव (जि.नाशिक) या शहराचा कायापालट करण्यासाठी भुयारी गटार योजना व नदीसुधार आराखड्यास निधीबाबत**

**(२५) ३३१२६ (२१-०१-२०१६). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) या शहराचा कायापालट करण्यासाठी भुयारी गटार योजना व नदीसुधार आराखड्यास केंद्र शासनाने दिनांक २१ जानेवारी, २०१४ मध्ये वा त्यासुमारास मंजूरी देऊनही अद्यापी या कामासाठी निधी मंजूर करण्यात आला नसल्याने माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यासुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामासाठी निधी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT अंतर्गत मंजूर मालेगाव शहर भुयारी गटार प्रकल्पास केंद्र शासनाने मान्यता दिली होती तथापि अभियान कालावधी मध्ये सदर प्रकल्पास निधी उपलब्ध न झालेने केंद्र शासनाने सदर प्रकल्पास दिलेली मान्यता रद्द केली आहे.

केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नदी व सरोवर संवर्धन विकास कार्यक्रम अंतर्गत मालेगाव शहराचा ४०.५० कोटी किंमतीचा मोसम नदी कृति आराखडा राज्य शासनाच्या पर्यावरण विभागामार्फत केंद्र शासनास सादर करण्यात आला आहे तथापि सदर प्रकल्पास अद्याप केंद्र शासनाकडून मान्यता अप्राप्त आहे.

(२) व (३) UIDSSMT अंतर्गत मंजूर भुयारी गटार प्रकल्प रद्द झालेने सदर प्रकल्प अमृत अभियानांतर्गत राबविण्याचे मालेगाव महानगरपालिकेचे नियोजन असून त्यानुसार सेवास्तर सुधारणा आराखडा मालेगाव महानगरपालिकेने शासनास सादर केला आहे. नदी संवर्धन प्रकल्पाच्या मंजूरीस्तव मालेगाव मनपातर्फे केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

---

## पुणे जिल्ह्यातील राजीव गांधी, कात्रज प्राणी संग्रहालयाचे विकासकाम अपुर्ण असल्याबाबत

**(२६) ३३२४८ (१३-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील राजीव गांधी, कात्रज प्राणी संग्रहालयाच्या विकासकामांचा पहिला टप्पा पंधरा वर्षांचा कालावधी पूर्ण होऊनही अपुर्ण अवस्थेत असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नीलगाय आणि सिंह यांच्या खंदकांचे काम आणि सर्पोद्यानाचा प्रकल्प अद्यापही अपूर्ण अवस्थेत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (३०-०३-२०१६) :** (१), (२) व (३) प्राणी संग्रहालयाच्या मंजूर आराखडयामध्ये नियोजित केल्याप्रमाणे आराखडयाची अंमलबजावणी चार टप्प्यात केली जाणार असून, प्रथम टप्प्यात नीलगाय खंदक बांधणी,सिंह खंदक बांधणी, नवीन सर्पोद्यान निर्मिती, निंसर्ग परिचय केंद्राची निर्मिती, लेसर कॅट (जंगल कॅट, लेपर्ड कॅट व रस्टी स्पॉटेड कॅट) खंदक बांधणी, शेकरु खंदक बांधणी, अंतर्गत रस्ते दुरुस्ती, पर्यटकांसाठी नवीन रेस्टींग शेड, शौचालये इ. कामे प्रस्तावित होती.

पहिल्या टप्प्यातील नमूद कामांपैकी नीलगाय खंदकाचे काम पुर्णत्वास आले असून पुढील दोन ते तीन महिन्यात खंदकामध्ये प्राणी स्थलांतरीत करता येतील. नवीन सर्पोद्यानच्या आरेखनास केंद्रीय प्राणीसंग्रहालय प्राधिकरणाने मंजूरी दिली असून, त्यानुसार सर्पोद्यानचे स्थापत्य विषयक कामकाज सुरु केलेले आहे. सिंह खंदकाच्या आरेखनास प्राधिकरणाची तत्वतः मंजुरी मिळाली आहे. त्याबाबतही निविदा विषयक कामकाज सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**धुळे शहरातील चाळीसगांव रोड परिसरातील नव्याने मंजूर करण्यात आलेल्या पोलिस स्टेशनास हुडको मधील मोकळी जागा मिळण्याबाबत**

**(२७) ३३५७२ (२१-०१-२०१६). श्री.अनिल (अण्णा) गोटे (धुळे शहर) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे शहरातील चाळीसगांव रोड परिसरातील नव्याने मंजूर करण्यात आलेल्या पोलिस स्टेशनसाठी पश्चिम हुडको मधील मोकळी जागा मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२/०८/२०१५ रोजी वा त्यापूर्वीही अनेक वेळा गृहनिर्माण मंत्री यांना पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्रातील मागणीनुसार पश्चिम हुडको मधील मोकळी जागा सार्वजनिक हितासाठी चाळीसगांव रोड पोलिस स्टेशनसाठी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (०५-०४-२०१६) :** (१) धुळे शहरातील चाळीसगांव रोड परिसरातील नव्याने मंजूर करण्यात आलेल्या पोलिस स्टेशनसाठी पश्चिम हुडको मधील मोकळी जागा मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (गृहनिर्माण) यांना पाठविलेले दिनांक १२/०८/२०१५ रोजीचे पत्र मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे कार्यालयामार्फत नगर विकास विभागास पाठविले आहे. मात्र स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे मा.मुख्यमंत्री यांना पाठविलेले दि. १९.११.२०१५ रोजीचे पत्र गृहनिर्माण विभागास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधींनी सदर वसाहतीत पोलिस स्टेशनसाठी मागणी केलेली जागा ही मंजूर अभिन्यासात Open Space म्हणून दर्शविण्यात आली आहे. सबब, या जागेवर कोणतेही बांधकाम अनूज्ञेय नाही.

म्हाडास देण्यात आलेले घरबांधणीचे उद्दीष्ट लक्षात घेता म्हाडास त्यांच्या अभिन्यासातील जागा उपलब्ध करुन देणे शक्य होणार नाही.

---

**जालना जिल्ह्यात दोन हजार कामगारांना अर्थसहाय्य दिले नसल्याबाबत**

**(२८) ३३६०६ (२३-१२-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे दिनांक ३१ मार्च, २०१४ रोजीपर्यंत नोदंणी झालेल्या बांधकाम, कामगारांना गृहपयोगी साहित्याऐवजी अर्थसहाय्य म्हणून शासनाने प्रत्येक कामगारांना देण्यात येत असलेले तीन हजार रुपये गत दीड वर्षापासून जालना जिल्ह्यातील तब्बल दोन हजार कामगारांना देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कामगारांना अद्यापपर्यंत मदतीचे वाटप न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या कामगारांना तातडीने सदरच्या अनुदानाचे वाटप करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश मेहता (३१-०३-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

शासन निर्णयानुसार दिनांक ३१ ऑगस्ट, २०१४ पर्यंत नोंदीत व जिवीत असलेल्या लाभार्थी कामगारांना सदरची योजना लागू आहे. जालना जिल्ह्यांतर्गत ३१ ऑगस्ट, २०१४ पर्यंत एकूण ६८०५ कामगारांची नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यापैकी ५७८४ कामगारांची नोंदणी जिवीत असल्याने ते सदर योजनेच्या लाभास पात्र आहेत.

जानेवारी, २०१६ पर्यंत जालना कार्यालयाकडे ४६३० अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त अर्जापैकी छाननीअंती २३५४ कामगारांना त्यांच्या बचत खात्यावर रक्कम रु. ३०००/- प्रमाणे एकूण रक्कम रु. ७०,६२,०००/- वाटप करण्यात आलेली आहे.

अर्थसहाय्य देण्यासाठी पात्र असलेल्या कामगारांना फक्त एकदाच अर्थसहाय्याची रक्कम वाटप करण्यात येते. सदरची रक्कम वाटप करताना बरेचसे कामगार दुसऱ्यांदा अर्ज सादर करतात, त्यामुळे एकाच कामगाराला पुन:लाभ वाटप करण्यात येऊ नये, याची दक्षता घेणे गरजेचे आहे. त्यामुळे अर्जाची छाननी करण्यास बराच कालावधी लागलेला आहे. त्यामुळे अर्थसहाय्य वाटप काही अशी पूर्ण होऊ शकलेले नाही.
(३) उर्वरित कामगारांना अर्थसहाय्याची रक्कम वाटप करण्याची कार्यवाही प्राधान्याने करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहराच्या नवीन विकास आराखड्याबाबत**

**(२९) ३३८१४ (२१-०१-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिपक चव्हाण (फलटण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहराच्या विकासासाठी राज्य शासनाने नियुक्त केलेल्या समितीने नुकत्याच जाहीर केलेल्या विकास आराखड्याला एका राजकीय पक्षामार्फत माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात विरोध दर्शविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर समितीने जाहीर केलेल्या विकास आराखड्यात कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर त्रुटी दुरुस्त करण्यासाठी सदर विकास आराखडा रद्द करुन नवीन विकासक आराखडा तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) भागश: खरे आहे, पुणे शहराचा जुन्या हद्दीचा विकास आराखडा शासनास सादर करण्यासाठी आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचे अध्यक्षतेखाली

त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात करण्यात आली होती. समितीने विकास आराखडा सादर करताना नियोजनाच्या दृष्टीकोणातून धोरण आखून त्या धोरणा नुसार आवश्यक बदल आराखड्यामध्ये करुन शासनाच्या मान्यतेसाठी सादर केलेला आहे.

(२) व (३) त्रिसदस्यीय समितीने विकासयोजना आराखडा सादर करतांना प्रस्तावित आरक्षणांबाबत धोरण आखून त्या धोरणानुसार आरक्षण वगळण्याचे प्रस्तावित केले असले तरी शासनास सादर झालेल्या या विकास आराखड्याची छाननी संचालक नगर रचना यांचे स्तरावर करण्यात येऊन त्यांचा अहवाल नुकताच प्राप्त झाला आहे, शासनस्तरावर विकास योजना छानणी समिती यांच्यामार्फत सुध्दा छानणी करण्यात येणार आहे. तद्नंतर शासन स्तरावर अंतिम निर्णय होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पीएमआरडीएचे काम पहाण्यासाठी पूर्ण वेळ अधिकारी व कर्मचारी नेमण्याबाबत**

**(३०) ३३९३१ (२१-०१-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एमएमआरडीए च्या धर्तीवर पुण्यामध्ये पीएमआरडीची (पुणे महानगर विकास प्राधिकरण) स्थापना करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पीएमआरडीएमध्ये अनेक प्रकारच्या परवानगी साठीचे अर्ज भरण्यासाठी ऑनलाईन नोंदणीसाठी अद्याप अधिकृत संकेतस्थळच नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, पीएमआरडीए चे काम पाहण्यासाठी पुर्ण वेळ अधिकारी व कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने ग्रामस्थांची प्रचंड गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय.

पुणे महानगरपालिका प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाची स्थापना दि.३१/०३/२०१५ रोजीच्या क्र.टिपीएस-१८१५/१२०४/१३/प्र.क्र..८७/१५/नवि-१३, अधिसूचनेद्वारे झाली आहे.

(२) पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे संकेत स्थळ विकसित करण्याची कार्यवाही सुरु असून त्याची पहिली पायरी म्हणून संकेतस्थळाच्या नामाभियानास केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र (एन आय सी) कडून मान्यता प्राप्त झाली आहे. नागरीकांना शक्यतो कार्यालयात येण्याची गरज भासू नये अशा पध्दतीने कार्यालयीन कामकाजाचे प्रचलन व्हावे असे संकेतस्थळ (वेबसाईट) तयार करण्याचे कामकाज सुरु आहे. त्याच्प्रमाणे PMRDA च्या कामकाजासाठी करण्यात आलेलया ई निविदांची कार्यवाही http#//pcndta.maharashtra. etenders.in या संकेत स्थळावरुन तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे.

(३) नाही.

शासनाने सुरुवातीला अत्यंत आवश्यक कार्मचारी/अधिकारी यांची ८९ पदे मान्य केली असून सदर पदे सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांमधून व प्रतिनियुक्तीने भरण्याबातची कार्यवाही सुरु आहे. सदर पदे प्रतिनियुक्तीने पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण इत्यादी तसेच, संचालक, नगर रचना संचालनालय इत्यादीकडून घेऊन प्राधिकरणाचे काम सुरळीतपणे चालु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बनावट नोटरी कागदपत्रे सादर करुन नवी मुंबईतील**
**एका व्यावसायिकाची फसवणूक केल्याबाबत**

**(३१) ३४२८९ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बनावट नोटरी कागदपत्रे सादर करुन नवी मुंबईतील एका व्यावसायिकाची फसवणूक केल्याप्रकरणी कुलाबा पोलिसांनी चार वकिलांविरोधात दिनांक १४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास गुन्हा दाखल केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी तपास करण्यात आला आहे काय,
(३) असल्यास, तपासानुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय.
दि.१२.१०.२०१५ रोजी ४ वकिल, महानगपालिकेचे २ वकिल व १ नोटरी यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) होय.
फिर्यादी श्री.हरिदासन नारायण किरीथोडी यांनी अर्जाद्वारे दिलेल्या तक्रारीवरुन कुलाबा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १३२./१५ कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून तपास करण्यात येत आहे.
(३) गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्ह्यातील आरोपींतांना चौकशीकरिता हजर राहणेबाबत फौ.द.प्र.स.कलम १६० अन्वये नोटीस बजावण्यात आली होती परंतु महानगरपालिकेचे २ वकिलांनी अटकपुर्व जामीन मिळणेकरिता मा.सत्र न्यायालयात अर्ज केला होता. सदरचा अर्ज मा.न्यायालयाने रिजेक्ट केल्यानंतर दोन वकिलांना अटक करण्यात आली. उर्वरित ४ वकिलांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अटकपुर्व जामीन मिळणेकरिता अर्ज केला आहे. सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर आणि उल्हासनगर या सहा महापालिका परिसरात सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळानी परवानगी न घेता मंडप उभारल्याबाबत

**(३२) ३४३०८ (२१-०१-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, मीरा-भाईंदर, भिवंडी-निजामपूर आणि उल्हासनगर या सहा महापालिका परिसरात ३०३ सार्वजनिक नवरात्रोत्सवांपैकी तब्बल २२० मंडळानी स्थानिक प्राधिकरणाकडून परवानगी न घेता मंडप उभारल्याचे जिल्हा प्रशासनाने दिलेल्या अहवालातून माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशा मंडळावर कोणती कारवाई केली आहे,

(३) नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :** (१) उल्हासनगर, ठाणे, मिरा-भाईंदर महानगरपालिकांच्या बाबतीत हे खरे आहे.

(२) महानगरपालिकेच्या संबंधित प्रभाग अधिकाऱ्यांनी विना परवानगी उभारण्यात आलेले मंडप काढून टाकण्याची कारवाई केली आहे. तसेच अशा मंडळांना कारणे दाखवा नोटीसा बजावून त्याचे विरुध्द स्थानिक पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागरी जमिन कमाल धारणा कायद्यांतर्गत महसूल विभागाने पारशिवनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी युयएल.सी. मुक्त करणेबाबत

**(३३) ३४६३१ (०८-०१-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी जमिन कमाल धारणा कायद्यांतर्गत महसूल विभागाने पारशिवनी तालुक्यातील कांद्री, कन्हान पिपरी, सिरोटा, खंडाळा, गहुहिवरा, टेकाडी येथील १६० शेतकऱ्यांच्या शेतजमिनी युएलसी मुक्त करणेबाबतचे निवेदन मा.लोकप्रतिनिधी यांनी मुख्यमंत्री यांना माहे जुलै, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १६० शेतकऱ्यांच्या शेतजमिनी यु.एल.सी. मुक्त करण्यासाठी शासनाने काही धोरण तयार केले आहे काय,

(३) असल्यास, उक्त शेतकऱ्यांना याचा लाभ कधीपर्यंत देण्यात येणार आहे वा देण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय.

(२) व (३) नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ अन्वये पारशिवणी तालुक्यातील संपादित करण्यात आलेल्या जमिनीच्या अनुषंगाने दि.२९/७/२०१५ रोजी आयोजीत मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, मे.व्होल्टास प्रकरणी मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर दि.१२/०५/२०१० च्या पत्रानुसार नागरी जमीन (कमाल धारणा व विनियमन) अधिनियम, १९७६ निरसीत होण्यापूर्वी कलम १० (३) व १० (५) ची कार्यवाही होऊन जमिनी ताब्यात घेण्यात आल्या नसतील तर त्या जमिनी ना.ज.क.धा. मुक्त करणेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांना कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेचे वडगाव खु. येथील रुग्णालयाचे काम पूर्ण करण्याबाबत**

**(३४) ३५२२७ (२१-०१-२०१६). श्री.योगेश टिळेकर (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव खु. येथील राजयोग सोसायटी जवळ पुणे महानगरपालिकेचे रुग्णालयाचे बांधकाम ५ वर्षापूर्वी सुरु होऊनही अद्यापही ते पूर्ण झाले नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रुग्णालयाच्या बांधकामासाठी महानगरपालिकेकडून निधी मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०३-२०१६) :** (१) वडगांव खु.येथील रुग्णालयाच्या पहिल्या फेजचे बेसमेंट+तळमजला+तीन मजले बांधण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

(२) सदर कामासाठी सन २०११-१२ ते २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये रुपये ६२५.२० लक्ष तरतूद उपलब्ध झाली आहे. त्यातील रुपये ४४६.६२ लक्ष खर्च झाले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुण्यातील बीडीपीचे आरक्षण कायम ठेवण्याच्या शासनाच्या निर्णयाबाबत**

**(३५) ३५४०७ (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुण्यातील बीडीपीचे आरक्षण कायम ठेवण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे हजारो सर्वसामान्याची घरे उद्धस्त होणार असल्याने एका राजकीय पक्षामार्फत सदर निर्णयाला विरोध दर्शविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निर्णयात बदल करून सर्वसामान्यांची घरे उद्धस्त होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१), (२) व (३) पुणे विकास आराखड्यामधील बिडीपीच्या आरक्षणाबाबत निर्णय शासनाने दिनांक ५/८/२०१५ च्या अधिसूचनेद्वारे अंतिमत: जाहिर केला आहे. त्यानुसार बिडीपी हे आरक्षण कायम ठेवण्यात आले असून या आरक्षणामध्ये दि.२१/०३/२००५ पुर्वबांधिलकी असलेल अधिकृत विकास झालेले बांधकामे/अभिन्यासाखालील भुखंडके वगळण्यात आलेली आहेत.

अधिकृत/पूर्वबांधीलकी असलेलया प्रकरणांमध्ये वरीलप्रमाणे दिलासा दिलेला असल्यामुळे फेरविचार करण्याची आवश्यकता वाटत नाही.

---

**पुणे शहरातील शासकीय इमारतींचे अग्निशमन यंत्रणेची फायर ऑडिट केले नसल्याबाबत**

**(३६) ३५४२२ (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विविध कार्यालयातील अग्निशमन यंत्रणेची माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान पाहणी केली असता इमारतीचे फायर ऑडिट केले नसल्याचे तसेच जागोजागी अग्निशमन यंत्राच्या पार्टचे ढिगारे पडल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनामर्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पुणे शहरातील शासकीय कार्यालयात अग्निशमन यंत्रणा व्यवस्थितरित्या राबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) पुणे शहरातील विविध शासकीय इमारतींचे फायर ऑडिट करण्याचे काम अग्निशमन दलाचे अग्निशमन अधिकारी आणि संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा, महाराष्ट्र शासन व पुणे महागनपालिका यांच्या वतीने, आग प्रतिबंधकजीव संरक्षण उपाययोजनाचे काम करण्यासाठी लायसन्स देण्यात आलेल्या अभिकरनांकडून करण्यात आलेले आहे. सदर फायदर ऑडिट दरम्यान संबंधित शासकीय विभागांना सूचित केल्यानुसार

त्या-त्या इमारतींमध्ये आवश्यक असणारी अग्निशमन यंत्रणा बसविण्याचे काम संबंधित विभागांकडून करण्यात येत असल्यास त्या यंत्रणेमध्ये बसविण्याचे काही भाग संबंधित इमारतीमध्ये आढळून आले असण्याची शक्यता आहे.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) महाराष्ट्र आग प्रतिबंधक-जीव संरक्षण उपायोजना अधिनियम, २००६ मधील कलम ३ नुसार कोणत्याही इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा बसविणे वा ती व्यवस्थितीरित्या कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी ही संबंधित इमारतीचे मालक/भोगवटादार यांची असून, त्याबाबत सर्व संबंधितांना यापूर्वीही कळविण्यात आलेले आहे. तसेच याकामी शहरातील स्थानिक वर्तमानपत्रामध्ये पुणे महानगरपालिकेच्या वतीने जाहीर प्रकटन देवून याबाबत सर्वांना अवगत करण्याची प्रक्रिया करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील उड्डाणपूलांचे काम संथ गतीने सुरु असल्याबाबत

**(३७) ३६०५२ (२१-०१-२०१६). श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील उड्डाणपूलांचे काम संथ गतीने सुरु असून या कामांची मुदत संपलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उड्डाणपूलांचे काम रखडण्याची नेमकी करणे काय आहेत,

(३) असल्यास, पुणे शहरामध्ये एकूण किती उड्डाणपूल बांधण्याची कामे सुरु आहेत,

(४) असल्यास, पुणे शहरातील उड्डाणपूलाचे बांधण्यास गती देण्यासाठी शासनानी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) उड्डाणपुलाच्या कामामाध्ये पूलाच्या आखणी अंतर्गत पूर्ण रस्तारुंदी क्षेत्र उपलब्ध नसणे, रस्त्यावर अतिक्रमणे असणे, पूलाच्या आखणीमध्ये येणारे विद्‌युत पोल, झाडे, पाण्याच्या व ड्रेनेज लाईन हलविणे त्याचप्रमाणे पूलाचे काम चालू असतना वाहतुक पोलिसांची परवानगी घेणे, काम सुरु असताना टप्पेनिहाय वाहतूक डायव्हर्जन करुन काम करणे इत्यादी विविध प्रकारच्या अडचणी त्या त्या उड्डाणपुलाच्या जागेवरील परिस्थितीनुसार असतात. सदर अडचणी दूर करण्यासाठी संबंधितांशी समन्वय ठेवून सातत्याने प्रयत्न करण्यात येत असतात ज्या ठिकाणी उपरोक्त कारणांमुळे उड्डाणपुलाचे काम प्रशासकीय अडचणीमुळे हाती घेता येत नाही त्याच ठिकाणी कामास विलंब होत असतो. निविदा अटी व शर्तीनुसार ठेकेदाराची कामाची प्रगती संथ असल्यास ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करण्यात येते. ज्या ठिकाणी प्रशासकीय अडचणीमुळे कामास विलंब होतो तेथे कामास मुदतवाढ द्यावी लागते.

(३) पुणे शहरात एकूण ७ उड्डाणपुलांची कामे चालू आहेत.
(४) सर्व संबंधित विभागांशी समन्वय साधून उड्डाणपूलांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) हद्दवाढ प्रस्ताव**

**(३८) ३६२९५ (२१-०१-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.योगेश टिळेकर (हडपसर), श्री.जगदीश मुळीक (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाचा (पीएमआरडीए) हद्दवाढ प्रस्ताव माहे जुलै, २०१५ पासून शासनाकडे प्रलंबित असल्याने विकास आराखडा प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे महानगर प्रादेशिक विकास आराखड्यास मान्यता देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) व (२) पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाची हद्दवाढ शासनाने दि. ०४/१२/२०१५ रोजी मंजूर केलेली आहे.

प्राधिकरणाच्या क्षेत्रातील विकास योजना तयार करण्याचे काम महानगर नियोजन समितीच्या निर्देशाप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ४२ई नुसार करावयाचे आहे. विकास योजना तयार करणेसाठी विद्यमान जमीन वापर नकाशा तयार करण्याच्या प्राथमिक पूर्व तयारीकरीता खाजगी संस्थांकडून आंतरराष्ट्रीय स्तरावर ई.निविदा मागणविण्यात आलेल्या आहेत.
(३) विलंब होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती शहर पाणी पुरवठा योजनेला मंजूरी प्रदान करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३९) ३७१७९ (२१-०१-२०१६). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात येथे अमरावती महानगरपालिकेच्या महत्वपूर्ण विषयांचे संदर्भात दिनांक २१.०५.२०१५ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त बैठकीमध्ये अमरावती शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या ४८.४९ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मंजूरी प्रदान करुन निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय झाला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रस्तावास शासनस्तरावर मंजूरी प्रदान करुन संबंधित यंत्रणेला निधी वितरीत करण्यात आला आहे काय,
(४) नसल्यास, याबाबत होणा-या विलंबाची कारणे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत सन २०१५-१६ या वर्षाच्या राज्य वार्षिक कृती आराखड्यामध्ये रु.८५ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पाचा समावेश आहे. त्याअनुषंगाने पहिल्या हप्त्याचा केंद्र व राज्य हिश्याचा मिळून रु. १२.७५ कोटी निधी वितरीत करण्यात आला आहे.

---

**पुणे महानगरपालिकेची असलेली मोकळी मैदाने व शाळेच्या मैदानांची भाडेवाढ केल्याबाबत**

**(४०) ३७९९२ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेची मोकळी मैदाने व शाळेच्या मैदानांची आयुक्तांनी दुप्पट-तिप्पट भाडेवाढ केली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरची भाडेवाढ रद्द करण्यासंदर्भात मा.पालकमंत्री यांनी आयुक्तांना पत्र देऊनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भाडेवाढ रद्द न करण्याची कारणे काय आहेत ,
(४) असल्यास, सदरची भाडेवाढ तातडीने रद्द करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०३-२०१६) :** (१) पुणे महानगरपालिकेच्या शाळांच्या खोल्या व मैदानाची दिनांक १६.५.२०१५ च्या आदेशान्वये केलेल्या भाडेवाढीमुळे सामाजिक संस्थांचे उपक्रम बंद पडण्याच्या मार्गावर असल्याची निवेदने महानगरपालिका कार्यालयात प्राप्त झालेली आहेत.
(२) सदर प्रकरणी पुणे महानगरपालिकेकडे प्राप्त झालेले आक्षेप विचारात घेऊन, भाडेवाढ सुधारित करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीमार्फत मुख्य सभेच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील कसबा पेठेतील जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयात दाखले मिळण्यास आठ दिवसांचा कालावधी लागत असल्याबाबत**

**(४१) ३८०१५ (२१-०१-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सेवा हमी कायदयामुळे तीन दिवसांत जन्म-मृत्यूचा दाखल देण्यात येईल असे असतांनाही पुणे शहरातील कसबा पेठेतील जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयात प्रत्यक्ष दाखले मिळण्यास आठ दिवसांचा कालावधी लागत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे नागरिकांच्या वेळेचा अपव्यय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जन्म-मृत्यूचा दाखला वेळेत मिळण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) हे खरे नाही.

पुणे शहरातील सर्व जन्म-मृत्यूच्या नोंदी ह्या संबंधित रुग्णालयांकडून कसबापेठ येथील जन्म-मृत्यू नोंदणी कार्यालयास प्राप्तझाल्यानंतर तीन दिवसात संगणकीकृत करून तद्नुसार पुणे महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रिय कार्यालय / संपर्क कार्यालयांकडील नागरी सुविधा केंद्र येथे उपलब्ध होतात व येथून निबंधक तथा आरोग्य अधिकारी यांच्या स्कॅन स्वाक्षरीचे दाखले नागरीकांना त्वरीत उपलब्ध होत आहेत.

जन्म-मृत्यूचे दाखले मिळण्यास आठ दिवसांच्या वर विलंब होत असल्याबाबत अद्यापपर्यंत महानगरपालिकेचे जन्म-मृत्यू नोंदणी विभागाकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) हे खरे नाही.

नागरीकांच्या वेळेचा अपव्य होवू नये म्हणून निबंधक तथा आरोग्य अधिकारी यांच्या स्वाक्षरीचे पत्र पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील जन्म-मृत्यूच्या घटना घडणाऱ्या रुग्णालयांना देण्यात आलेले आहे. तसेच लोकसेवा हक्क हमी कायद्याप्रमाणे जन्म-मृत्यू नोंदणी विभागाकडे नोंद करण्यात आलेल्या नोंदणीचे तीन दिवसांत संगणकीकरण करण्यात येत असून, पुणे महानगरपालिकेच्या १५ क्षेत्रिय कार्यालयाकडून नागरी सुविधा केंद्र यांना दाखले मिळण्यासाठीची पावती केल्यानंतर त्वरित जन्म-मृत्यू दाखल्यांची प्रिंट काढून दाखले उपलब्ध करुन देण्याबाबत पत्र पाठविण्याबत आलेली आहे व त्याप्रमाणे सध्या कामकाज सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील शेती भागातून रहिवास वापर अनुज्ञेय करण्यास अधिमुल्य आकारणी निर्णय शिथिल करण्याबाबत**

**(४२) ३८४२३ (२१-०१-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील मंजूर प्रादेशिक योजना पुणे क्षेत्रात "शेती तथा ना विकास विभाग' या वापर विभागामध्ये गावठाणापासून विवक्षित अंतरामध्ये अनुज्ञेय करावयाच्या रहिवास वापरासाठी संभाव्य बिनशेती दराचे ५० टक्के अधिमुल्य आकारणी लागू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे जिल्ह्यातील प्रादेशिक योजना दिनांक २५.११.१९९७ रोजी मंजूर असून दिनांक १०.०२.१९९८ पासून अंमलात आलेली आहे तेव्हा पासून दिनांक २६.५.२०१५ पर्यंत या विवक्षित अंतरामध्ये कोणतेही अधिमुल्य आकारणी करण्यात येत नव्हती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अधिमुल्य आकारणी लागू केल्याने रहिवासी क्षेत्रातील जमिनींचे भाव मोठ्या प्रमाणावर वाढणार आहेत तसेच सदर निर्णय शेतकऱ्यांसाठी अन्यायकारक असल्याने अधिमुल्य आकारणी लागू करण्यात येऊ नये याबाबतचा प्रस्ताव प्रधान सचिव (नगरविकास विभाग) यांना माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेती भागातून रहिवास वापर अनुज्ञेय करण्यास अधिमुल्य आकारणी निर्णय शिथिल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६)** : (१) व (२) मंजूर पुणे प्रादेशिक योजनेच्या विकास नियंत्रण नियमावली मध्ये ज्या ठिकाणी परिसर नकाशा तयार करण्यात आलेला नाही अशा परिसरातील नाविकास क्षेत्रामध्ये विद्यमान गावठानापासून विवक्षीत अंतरामध्ये नियमानुसार विकास अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. नाविकास क्षेत्रामध्ये रहिवास वापर विकास परवानगी देतांना संभाव्य बिनशेती दराचे ५० टक्के अधिमुल्य आकारणी करुन विकास परवानगी अनुज्ञेय करण्याबाबत अधिनियमाचे कलम -२०(३) अन्वये सूचना दि. ०६/०५/२०१५ रोजी निर्गमित करण्यात आली होती.

(३) व (४) उक्त सूचना प्रसिध्द झाल्या नंतर स्थानिक लोकांना प्राप्त हरकतीसूचना, लोकप्रतिनिधींच्या सुचना व नियुक्त अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेऊन शासनाने उक्त सूचना अधिनियमाचे कलम २०(४) अन्वये दि. ०४/०१/२०१६ रोजी अंतिम रीत्या निर्गमित केली असून त्यामध्ये रहिवास वापर विकास परवानगी देताना संभाव्य बिनशेती दराचे ऐवजी संबंधित जमिनीचा वार्षीक बाजार मुल्य दर तक्त्यातील दर विचारात घेऊन ३० टक्के अधिमुल्य आकारणी करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पिंपरी - चिंचवड शहरातील ६८ हजार अनधिकृत बांधकाम नियमित करण्याबाबत

**(४३) ३८६५९ (२१-०१-२०१६). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड शहरातील ६८ हजार अनधिकृत बांधकाम नियमित करण्यात येतील असे मा.मुख्यमंत्री यांनी मागील पावसाळी अधिवेशनात आश्वासित केले होते. परंतु अदयाप "सिताराम कुंटे समिती" च्या अहवालावर निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी विधी व न्याय विभागाने अभिप्राय दिला आहे काय, त्यानुसार कोणता निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, सदर निर्णयानुसार ६८ हजार घरांना नियमित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामांना निर्बंध/आळा घाल्ण्याकरिता धोरण ठरविण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८९४/प्र.क्र.८२/१४/नवि-१३, दि. १२/०६/२०१४ अन्वये गठीत केलेल्या समितीने सविस्तर अहवाल दिनांक ०५/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

सदर अहवाल शासनाने स्विकारला असून त्याआधारे अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करणे, अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी प्रशासकीय तसेच कायद्यामध्ये सुधारणा प्रस्तावित करणे, झालेली अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्यासाठी धोरण ठरविणे इ. साठीचे शासनाने, धोरण ठरवून त्या धोरणास दि. १० मार्च, २०१६ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झालेली आहे. अनधिकृत बांधकामासंबंधी विविध जनहित याचिका मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या असल्याने मा.उच्च न्ययालयाने नवी मुंबई (दिघा गाव) येथील दाखल झालेल्या जनहित याचिकांमधील अंतरिम निर्णयानुसार शासनाचे मा.मंत्रीमंडळाने मान्य केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाची अनुमती अपेक्षिलेली होती. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दि. २६/०४/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अनधिकृत बांधकामे नियमानुकूल करण्यास अनुमती दिलेली नाही. त्यामुळे सध्या याविषयी कोणतेही आदेश/शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले नाही.

---

**पुणे जिल्हयातील पिंपरी-चिंचवड येथील पुनावळे येथे कचरा डेपो उभारण्याबाबत**

**(४४) ३८९७४ (२३-१२-२०१५). श्री.सुरुपसिंग नाईक (नवापूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे येथे पिंपरी-चिंचवड मध्ये दिवसेंदिवस कच-याचा प्रश्न गंभीर होत आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. पुनावळे येथे वन खात्याची २२.८ हेक्टर जागा कचरा डेपोसाठी आरक्षित आहे त्यासाठी महापालिकेने सुमारे साडेतीन कोटी रुपये अदाही केले आहेत. परंतू त्या ठिकाणी प्रकल्पाचे काम मार्गी लागलेले नाही. त्यामुळे येथील नागरिकांनी पिंपरीतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकात उपोषण केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनावळे येथे तातडीने कचरा डेपो उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२२-०३-२०१६) :** (१) होय.
(२) पुनावळे येथील कचरा डेपोची जागा हस्तांतरित करण्यासाठी विभागीय आयुक्त, पुणे यांनी महसूल व वन विभागास दिनांक २०.३.२०१४ रोजी प्रस्ताव पाठविला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कुंटे समितीचा अहवाल शासनाकडून जाहीर न करताच अन्य नवीन धोरणाची आखणी करण्यात येत असल्याबाबत**

**(४५) ३९३२८ (२१-०१-२०१६). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनधिकृत बांधकामांच्या प्रश्नावर शासनाने गठीत केलेल्या कुंटे समितीचा अहवाल शासनाने जाहीर न करताच अन्य नवीन धोरणाची आखणी करण्यात येणार असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मार्च, २०१५ मध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मा.मुख्यमंत्री यांनी या समितीचा अहवाल तत्वत: स्वीकारल्याचे घोषित केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१), (२), (३) व (४) राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामांना निर्बंध/आळा घाल्ण्याकरिता धोरण ठरविण्यासाठी शासन निर्णय क्र. टिपीएस-१८९४/प्र.क्र.८२/१४/नवि-१३, दि. १२/०६/२०१४ अन्वये गठीत केलेल्या समितीने सविस्तर अहवाल दिनांक ०५/०३/२०१५ रोजीचे पत्रान्वये शासनास सादर केला आहे.

सदर अहवाल शासनाने स्विकारला असून त्याआधारे अनधिकृत बांधकामांवर कार्यवाही करणे, अनधिकृत बांधकामे होऊ नये यासाठी प्रशासकीय तसेच कायद्यामध्ये सुधारणा प्रस्तावित करणे, झालेली अनधिकृत बांधकामे नियमानुकुल करण्यासाठी धोरण ठरविणे इ. साठीचे शासनाने धोरण ठरवून त्या धोरणास दि. १० मार्च, २०१६ रोजी झालेल्या मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झालेली आहे. अनधिकृत बांधकामासंबंधी विविध जनहित याचिका मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल झालेल्या असल्याने मा.उच्च न्यायालयाने नवी मुंबई (दिघा गाव) येथील दाखल झालेल्या जनहित याचिकांमधील अंतरिम निर्णयानुसार शासनाचे मा.मंत्रीमंडळाने मान्य केलेल्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी मा.उच्च न्यायालयाची अनुमती अपेक्षिलेली होती. तथापि, मा.उच्च न्यायालयाने दि. २६/०४/२०१६ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये अनधिकृत बांध्‌कामे नियमानुकूल करण्यास अनुमती दिलेली नाही. त्यामुळे सध्या याविषयी कोणतेही आदेश/शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले नाही.

---

## राज्यात राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक, इतिहासप्रसिध्द व्यक्ती, संत-महात्मे आणि राजकीय नेत्यांची स्मारके उभारण्याबाबत

**(४६) ४०३४९ (१७-०५-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक, इतिहास प्रसिध्द व्यक्ती, संत-महात्मे आणि राजकीय नेत्यांची स्मारके उभारण्यासंदर्भात मार्गदर्शक तत्वांचा समावेश असणारे धोरण शासनाने दिनांक ८ जानेवारी, २०१५ रोजीच्या सुमारास जाहिर केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर धोरणातील मार्गदर्शक तत्वाचे थोडक्यात स्वरुप काय असून उक्त धोरणांची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) दिनांक १२ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयान्वये धोरण घोषित करण्यात आले आहे.

(२) व (३) राष्ट्रपुरुष/थोर व्यक्ती या व्यतिरिक्त अन्य व्यक्तींच्या स्मारकाबाबतची मार्गदर्शक तत्वे विहित करावीत, राज्यात एका राष्ट्रपुरुष/थोर व्यक्तीची दोन पेक्षा अधिक स्मारके शासकीय खर्चातून उभारण्यात येऊ नयेत, एकाच राष्ट्रपरुष/थोर व्यक्तींची दोन्ही स्मारके एकाच प्रशासकीय विभागात उभारु नयेत, स्मारके केवळ पुतळ्याच्या स्वरुपात न उभारता ती शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, सभागृहे, संशोधन संस्था, ग्रंथालये, वाचनालये, वसतीगृहे, नवीन समाजोपयोगी योजना या स्वरुपात उभारली जावीत, स्मारक उभारण्याबाबतचा निर्णय घेण्याची कार्यपध्दती, समितीची रचना, स्मारक उभारल्यानंतर त्याच्या देखभालीची व्यवस्था करणे इत्यादी मार्गदर्शक तत्वे सदर स्मारक धोरणात अंतर्भूत करण्यात आली आहेत.

सदर स्मारक धोरण शासन निर्णयाच्या दिनांकापासून म्हणजे १२.१.२०१६ रोजी अंमलात आले आहे.

---

## मंत्रालयातील गॅसपाईप लाईन मध्ये अचानक गॅस गळती झाल्याबाबत

**(४७) ४०७८६ (१७-०५-२०१६). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंत्रालयातील गॅससिलेंडरच्या गोदामाजवळील भूमिगत गॅसपाईप लाईन मध्ये अचानक गॅस गळतीला सुरूवात झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मंत्रालय उपहारगृहास गॅस पुरवठा करणाऱ्या नलिकेमधील एका ठिकाणी गळती होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर तात्काळ गॅस पुरवठा बंद करण्यात आला व तातडीने नविन गॅस पाईप लाईन बसविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बेळगांव कारवारसह संयुक्त महाराष्ट्र करण्याबाबतचा ठराव**

**(४८) ४६७५८ (१७-०५-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत न्यायालयात योग्य बाजू मांडून सिमावासियांना न्याय मिळवून द्यावा आणि बेळगांव कारवारसह संयुक्त महाराष्ट्र करण्याबाबत तातडीने उपाययोजना करण्यात याव्या अशा आशयाचा ठराव माहे जानेवारी, २०१६ मध्ये झालेल्या साहित्य संमेलनात पारीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्या, या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०९-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) असे असले तरी कर्नाटकातील मराठी बहुभाषिक प्रदेश महाराष्ट्रात समाविष्ट व्हावा या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने केंद्र व कर्नाटक शासनाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात यापूर्वीच दावा दाखल केलेला असून राज्याची बाजू प्रभावीपणे मांडण्यासाठी तज्ञ व अनुभवी वकीलांची टीम नियुक्त केली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१२/०९/२०१४ रोजी दाव्यातील साक्षीपुरावे नोंदविण्यासाठी मा.कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती केली असून त्यानुषंगाने वकीलमहोदयांमार्फत तज्ञ साक्षीदारांची तयारी प्राधान्याने सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात स्पर्धा परिक्षेचे शुल्क कमी करण्याबाबत**

**(४९) ५०३६६ (१७-०५-२०१६). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात स्पर्धा परिक्षेच्या माध्यमातून शासनाला मोठया प्रमाणात महसूल मिळत असून ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगारांना शहराच्या ठिकाणी परिक्षेचा अर्ज भरण्याकरिता ये-जा करणे व परिक्षा शुल्क मिळून एकूण १ हजार रुपये पर्यत खर्च येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर परिक्षार्थीची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यांना इतके परिक्षा शुल्क भरणे शक्य नसल्याने परिक्षेचे शुल्क कमी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०६-२०१६) :** (१) हे खरे नाही.
महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच निवड समित्यांमार्फत आयोजित स्पर्धा परीक्षांसाठी उमेदवारांकडून खालीलप्रमाणे शुल्क घेण्यात येते -

| | अमागास | मागास |
|---|---|---|
| म.लो.आ. पूर्व परीक्षा | ३७३ | २७३ |
| मुख्य परीक्षा | ५२३ | ३२३ |
| राज्यनिवड समिती | ३०० | १५० |

आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व पदांसाठी ऑनलाईल अर्ज स्विकारण्यात येत असून गावोगावी असलेल्या सेतू/संग्राम केंद्रातून अथवा सायबर कॅफेतून ऑनलाईन अर्ज करता येतो
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही,

स्पर्धा परीक्षांच्या परिक्षार्थींची वाढती संख्या व वाढणारी परीक्षा केंद्र ह्यामुळे आयोजनाकरिता विविध टप्यावर करावा लागणारा खर्च (जाहिरात प्रसिध्द करणे, अर्ज स्विकारणे, उमेदवारांचा डेटा ऑनलाईन पध्दतीने गोळा करुन तो प्रोसेस करणे, प्रवेशपत्रे पाठविणे यासाठी संगणक संस्थेस अदा करावे लागणारा खर्च, तसेच छपाई इ.) विचारात घेऊन महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच राज्य निवड समित्यांच्या परीक्षांसाठी वरीलप्रमाणे शुल्क निश्चित करण्यात आले आहे.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा अंतिम निकाल लागल्या बरोबर उमेदवारांची प्रतिक्षा यादी जाहीर करण्याबाबत

**(५०) ५१३६६ (१७-०५-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षेचा अंतिम निकाल लागल्या बरोबर उमेदवारांची प्रतिक्षा यादी जाहीर करावी अशी मागणी सतत राज्यातील उमेदवारांनी आयोगाकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने परीक्षेच्या निकालानंतर प्रतीक्षा यादी जाहीर करण्याचा निर्णय सन २०१४ मध्ये घेतला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०६-२०१६) :** (१) होय.

(२) होय, एकाकी संवर्ग निवडीत पुढील जाहिरात किंवा एक वर्ष यापैकी जे आधी घडेल तोपर्यंत प्रतीक्षायादी ठेवण्याचा स्थायी आदेश आयोगाने दिनांक २२ जानेवारी, २०१४ रोजी प्रसिध्द केला आहे.

(३) निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.